दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ रविवार, १० मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : २३ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## ट्रायबल वुमेन्स फोरमच्या राज्य उपाध्यक्षपदी सौ.स्वाती पारधी

महाराष्ट्र जीत



**भिवंडी, (सुनील झळके) :** आदिवासी समाजाच्या सामाजिक कार्यात नेहमीच सहभागी असलेल्या स्वाती सुरेश पारधी यांची ट्रायबल वुमेन्स फोरमच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.ही नियुक्ती ट्रायबल फोरमचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष अँड. प्रमोद घोडाम यांनी केली आहे.'ट्रायबल फोरम' या संघटनेची 'ट्रायबल वुमेन्स फोरम' ही महिला शाखा आहे. हे संघटन आदिवासी समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक व आर्थिक प्रगती,अस्तित्व,अस्मिता आणि आत्मसन्मानासाठी तसेच संस्कृतीचे जतन व संवर्धन करुन सांस्कृतिक घुसखोरी रोखण्यासाठी कँडरबेस, शिस्तबद्ध, वैचारिक असलेल्या ट्रायबल वुमेन्स फोरमची निर्मिती झाली असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पातळ्यांवर लढा देत आहे.वैचारिक व शिस्तबद्धअसलेल्या संघटनेमध्ये नियुक्ती झाल्यामुळे राज्यभरात महिलांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

## प्रथम पाच क्रमांकावर मुलींनी बाजी मारली

•न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा निकाल 85.71%.
•प्रथम पाच क्रमांकावर मुलींनी मारली बाजी

महाराष्ट्र जीत



**मुंबई प्रतिनिधी: (सतिश पाटील) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ यांच्या द्वारे मार्च 2026मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून या मध्ये

श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयाचा निकाल 85.71%लागला असून पहिल्या पाच क्रमांकावर मुलींनी बाजी मारली आहे या मध्ये प्रथम क्रमांक कु.तन्वी अनिल चव्हाण 74.40% दुसरा क्रमांक कु.रिया सचिन चव्हाण 72.20% तिसरा क्रमांक कु.सिध्दी युवराज जाधव65. 60%चौथा क्रमांक कु.जान्हवी सर्जेराव भोसले 62.40%पाचवा क्रमांक कु.हर्षदा दत्तात्रय चव्हाण60.20% प्रथम पाच विद्यार्थ्यांनी चे तसेच यशस्वी विद्यार्थी यांचे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थ. शाळा समिती व संस्थेचे उपाध्यक्ष सचिव सहसचिव खजिनदार सर्व संचालक यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले व वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पोस्ट विभाग हा भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### 'जन सेवा कनेक्ट' उपक्रमांतर्गत अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज पोस्ट ऑफिस जनतेच्या सेवेत दाखल

महाराष्ट्र जीत



**मुंबई :** गरीब-श्रीमंत, जात-धर्म न पाहता पोस्ट विभागाची सेवा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली आहे. कारगिल युद्धाच्या काळातही वीर जवानांचे संदेश त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणारे पोस्टमन हे मानवी संवेदनांचे वाहक ठरले. पोस्ट विभाग हा केवळ सेवा देणारा विभाग नसून भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दळणवळण तसेच ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानक परिसरातील नूतनीकरण करण्यात आलेल्या अत्याधुनिक पोस्ट ऑफिसचे लोकार्पण करण्यात आले.यावेळी आमदार अमित साटम, आमदार हारून खान, महाराष्ट्र-गोवा सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंह तसेच पोस्टमास्तर जनरल के. अरोरा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'वारसा आणि विकास' या विचारातून पोस्ट विभागाने आधार सेवा, बँकिंग सेवा, ऑटोमॅटिक पार्सल सेवा यांसारख्या आधुनिक सेवांचा स्वीकार केला आहे. इंटरनेट, एसएमएस आणि ई-मेलसारख्या आधुनिक संदेशवहन साधनांमुळे पोस्ट विभागासमोर आव्हाने निर्माण झाली. खासगी कुरिअर सेवांमुळे स्पर्धाही वाढली. मात्र प्रधानमंत्री मोदी यांच्या दूरदृष्टीतून पोस्ट विभागाच्या सामर्थ्याला नवी दिशा मिळाली. पोस्ट बँकसारख्या सेवांमुळे विभागाने मोठे परिवर्तन साधले असून या परिवर्तनात केंद्रीय मंत्री शिंदे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

पोस्ट विभागाने महसुलातील वाढीचा दर अडीच टक्क्यांवरून यंदा १६ टक्क्यांपर्यंत नेला असून नव्या स्वरूपात जनतेच्या सेवेत दाखल होताना अनेक नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. पोस्टमन आणि पोस्ट विभागाचे समाजजीवनातील महत्त्व मराठीतील पु. ल. देशपांडे तसेच हिंदी लेखक शरद जोशी यांच्या साहित्यामधूनही अधोरेखित झाले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सामान्य माणसासाठी पोस्ट विभागाने मोठी कामगिरी बजावली असल्याचेही त्यांनी नमूद केले.राज्यात 'जनसेवा कनेक्ट'च्या माध्यमातून २२०० पोस्ट ऑफिस सुरू करण्यात येत असून त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे त्यांनी आभार मानले.

पोस्ट विभागाने सर्वसामान्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला–केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले की, गाव असो वा शहर, प्रत्येक कुटुंबाच्या मनामध्ये पोस्टमनबद्दल विशेष आत्मीयता आहे. देशातील दीड लाख पोस्ट कार्यालयांमार्फत सेवा देताना पोस्ट विभागाने सर्वसामान्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला आहे. पोस्ट लाईफ इन्शुरन्समध्ये दीड कोटी खाती आणि जवळपास दोन लाख कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून पोस्ट बँकेत ४० कोटी खाती उघडण्यात आली आहेत. या माध्यमातून पोस्ट विभागाने जनतेचा मोठा विश्वास संपादन केला आहे.स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक वारसा जपत पोस्ट विभागाचे आधुनिकीकरण करण्यात आले असल्याचे सांगताना केंद्रीय मंत्री शिंदे यांनी २००७ साली राज्यमंत्री असताना पोस्टमनच्या मुलांना केंद्रीय विद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न केल्याची आठवण सांगितली.




## अव्यक्त अबोली साहित्य मंचाचे आगामी दहावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन

महाराष्ट्र जीत




**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** अव्यक्त अबोली साहित्य मंच आयोजित अव्यक्त अबोली साहित्य मंचाच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त दहावे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दि.२४/०५/२०२६ सिद्धार्थ नवयुवक वाचनालय पुलगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.या संमेलनाला संमेलनाध्यक्ष कु. स्नेहल सोनटक्के,यवतमाळ स्वागताध्यक्ष रवी बोदिले पुलगाव, उद्घाटक प्रतीक टेभुर्णे पुलगाव तर प्रमुख अतिथी म्हणून हेमंत कुमार कांबळे यवतमाळ, प्रिया वाकडे यवतमाळ,अंकुश वाकडे यवतमाळ यांची उपस्थिती लाभणार आहे.

दुसऱ्या सत्रात व्याख्यानमाला व तिसऱ्या सत्रात निशुल्क काव्यलेखन पुरस्कार असणार आहे.

चौथ्या सत्रात विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कवी, साहित्य, समाजसेवेत अग्रेसर असणाऱ्या, आरोग्य, संस्कृती, कला अशा विविध क्षेत्रात कार्य करत असणाऱ्या कवी समाजसेवक यांना सन्मानित करण्यात येणार आहे.त्यानंतर एकांकिका सादरीकरण होईल यात खुशबू बडवाणे आणि भावना बागडे यांचे सादरीकरण होईल.त्यानंतर निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजन महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील आलेल्या कवींकरिता सादरीकरण असणार आहे .

आणि शेवटी समारोप होणार आहे. या संमेलनाचे आयोजक जयश्री चव्हाण पुलगाव, योगेश ताटे नांदेड आणि प्रांजली काळबेंडे वसई असून अव्यक्त अबोली बहुउद्देशिय संस्थेचे सदस्य व पदाधिकारी आहेत.

## मरखेल मारहाण प्रकरणात तिघांना सत्र न्यायालयातून दिलासा

### बिलोली सत्र न्यायालयाने मंजूर केला नियमित जामीन

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** मरखेल पोलीस स्टेशन गु.र.नं. ५६/२०२६ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या गाजलेल्या मारहाण प्रकरणात बिलोली येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी दिलीप गोविंदरेड्डी मुसने, पांडुरंग नागनाथरेड्डी संगनगिरे व बालाजीरेड्डी मारोतीरेड्डी संगनगिरे (सर्व रा. दावणगीर ता. देगलूर) यांना नियमित जामीन मंजूर करून मोठा दिलासा दिला आहे.

सदर प्रकरणात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यापूर्वी आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर झाला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले होते. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयानेही नियमित जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आरोपींनी सत्र न्यायालयात धाव घेतली होती.

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाच्या वतीने ॲड.अंकुशराजे जाधव व ॲड. सद्दाम शेख दावणगीरकर यांनी युक्तिवाद करत एफआयआर दाखल करण्यात तीन दिवसांचा अनाकलनीय विलंब झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच फिर्यादमध्ये नमूद आरोप व वैद्यकीय निष्कर्ष यामध्ये स्पष्ट विसंगती असून, आरोपींविरुद्ध करण्यात आलेले आरोप अतिशयोक्तीपूर्ण स्वरूपाचे असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. बचाव पक्षाने पुढे असा मुद्दा मांडला की, प्रकरणात कोणतीही जप्ती बाकी नसून आरोपींची पुढील कोठडी आवश्यक नाही.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपींना योग्य त्या अटी व शर्तींसह नियमित जामीन मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. सद्दाम शेख दावणगीरकर यांनी काम पाहिले.

## संपादकीय

### युद्ध आणि स्त्रियांची परवड

युद्ध केवळ सीमांवर लढले जात नाही; त्याचे सर्वात खोल घाव सामान्य नागरिकांच्या आयुष्यावर उमटतात. विशेषतः स्त्रिया आणि मुली युद्ध, विस्थापन, लैंगिक हिंसा आणि आर्थिक असुरक्षिततेच्या दुहेरी संकटाला सामोरे जातात.

पश्चिम आशियातील इराण विरुद्ध अमेरिका आणि इस्रायल युद्धाने संपूर्ण क्षेत्राची भू-राजकीय स्थिती अस्थिर केली. समाजात युद्ध आणि लष्करी वर्चस्वाचे उदात्तीकरण करण्यासाठी युद्धवीरांच्या संचलनासारख्या आणि स्मारकांसारख्या परंपरा विकसित केल्या गेल्या आहेत. परंतु, आधुनिक युद्धांमध्ये सैनिकांपेक्षाही सामान्य नागरिकांची सर्वाधिक हानी होते, या तथ्याकडे फार कमी लोकांनी लक्ष वेधले आहे. त्यातही स्त्रिया आणि मुली मोठ्या संख्येने युद्धामुळे प्रभावित होतात, हे वास्तव स्वीकारणारे तर त्याहूनही कमी आहेत.

संयुक्त राष्ट्र निर्वासित उच्चायुक्तांच्या जून 2025 मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'ग्लोबल ट्रेंड्स् : फोर्स्ड डिस्प्लेसमेंट इन 2024' या अहवालानुसार, समकालीन विश्वात युद्ध आणि हिंसाचार हे केवळ सीमांचे प्रश्न राहिलेले नसून, त्यांनी एका सखोल मानवी संकटाचे रूप धारण केले आहे. हा अहवाल सांगतो की, एप्रिल 2025 पर्यंत जगात 12.2 कोटी लोक युद्ध, हिंसाचार, छळ आणि मानवाधिकार उल्लंघनामुळे विस्थापित झाले होते. चिंतेची बाब म्हणजे या निर्वासितांमध्ये निम्मी संख्या स्त्रिया आणि मुलींची आहे, तर सुमारे 40 टक्के मुले आहेत.

सप्टेंबर 2025 मध्ये संयुक्त राष्ट्र सरचिटणीसांनी जारी केलेल्या 'वूमेन, पीस अँड सिक्युरिटी अजेंडा'मध्ये असा इशारा दिला आहे की, जगभरातील सुमारे 67.6 कोटी स्त्रिया अशा भागात राहात आहेत, जे संघर्ष क्षेत्रापासून 50 किलोमीटरच्या परिघात आहेत. या अहवालानुसार 1946 नंतर जग आज सर्वाधिक सक्रिय सशस्त्र संघर्षांना तोंड देत असून, हे स्त्रिया आणि मुलींसाठी गंभीर धोका आणि अभूतपूर्व वेदनांचे कारण ठरत आहे. ही परिस्थिती गेल्या दोन दशकांत महिला अधिकारांच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीला कमकुवत करू शकते.

अमेरिकन स्त्रीवादी कार्यकर्त्या सुसान ब—ाऊनमिलर त्यांच्या 'अगेंस्ट अवर विल : मेन, वीमेन अँड रेप' या पुस्तकात लिहितात की, बलात्कार ही भीती निर्माण करण्याची एक जाणीवपूर्वक केलेली प्रक्रिया आहे, ज्याद्वारे स्त्रियांना सतत भीती आणि असुरक्षिततेच्या छायेत ठेवले जाते. तसेच 2004 मध्ये प्रकाशित झालेल्या वेनोना जाईल्स आणि जेनिफर हाइंडमॅन यांच्या 'साइटस् ऑफ व्हायोलन्स : जेंडर अँड कॉन्फ्लिक्ट झोन्स' या पुस्तकात इराक, सुदान आणि पूर्व युगोस्लाव्हियासारख्या संघर्षग्रस्त भागांची उदाहरणे देऊन हे स्पष्ट केले आहे की, आधुनिक युद्धांचा हिंसाचार केवळ युद्धभूमीपुरता मर्यादित राहात नाही, तर तो नागरी जीवनात स्त्रिया आणि मुलांना अत्यंत कठीण परिस्थितीशी झुंजायला भाग पाडतो.

अशा प्रकारे युद्ध हे केवळ लष्करी किंवा राजकीय संकट उरत नाही, तर ते समाजात आधीच अस्तित्वात असलेल्या लैंगिक विषमतेला अधिक गडद करते. परिणामी, स्त्रियांनाच मानवी मदतीची सर्वाधिक गरज असते. पण मदत आणि पुनर्वसनापर्यंत त्यांची पोहोच सर्वात जास्त बाधित झालेली असते, ही बाब खेदजनक आहे. युद्ध संपल्यानंतरही स्त्रिया अनेकदा धोक्याच्या स्थितीतच राहतात. लैंगिक हिंसाचार अनेकदा संघर्षाच्या समाप्तीनंतरही बराच काळ सुरू राहतो. संघर्षाच्या वेळी सुरक्षेचे धोके किंवा आर्थिक अडचणींमुळे मुलींचे शिक्षण थांबवले जाते, ज्यामुळे कमी वयात विवाहाची शक्यता वाढते. युद्धाच्या परिस्थितीत मानवी मदतही मुलींना समान प्रमाणात उपलब्ध होत नाही. लैंगिक हिंसेशी जोडलेला सामाजिक कलंक या संकटाला अधिक तीव्र करतो.

अशा परिस्थितीत पीडित स्त्रिया अनेकदा गप्प राहण्यास विवश होतात. त्या ना हिंसेची तक्रार नोंदवू शकतात, ना आवश्यक ती मदत मिळवू शकतात. आर्थिक असमानताही या शोकांतिकेला अधिक तीव्र करते.

# विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त राष्ट्रीय युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांच्या उपस्थितीत बहुजन परिवर्तन महापरिषदेचे आयोजन

## आम्ही येत आहोत तुम्हीही मोठ्या संख्येने उपस्थित रहा :- सचिन भाऊ हिरे तालुकाध्यक्ष

महाराष्ट्र जीत

**ओझर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे** : वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय नेते श्रद्धेय मा. ॲड प्रकाश आंबेडकर शाखा ओझर शहर तालुका निफाड यांच्या विद्यमाने भगवान गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांची बहुजन परिवर्तन महापरिषद शुक्रवार दिनांक 15 मे 2026 वेळ सायंकाळी 5.00 ठिकाण भगवा चौक ओझर मिग तालुका निफाड जिल्हा नाशिक आयोजित केले असून तमाम आंबेडकरी समाज बांधवांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य आयोजक वंचित बहुजन आघाडीचे निफाड तालुका अध्यक्ष सचिन दादा हिरे यांनी केले आहे याप्रसंगी प्रमुख अतिथी मा,दिशा ताई पिंकी शेख,मा, तय्यबजी सफर, मा. ॲड सर्वजित बनसोडे हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष चेतन दादा गांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे तसेच या कार्यक्रमाचे खास आकर्षण मी होणार सुपरस्टार सुर नवा ध्यास



राष्ट्रीय युवा अध्यक्ष



तालुका अध्यक्ष

नवा कलर्स मराठी महाराष्ट्राचा युवा रॉकस्टार संतोष जोंधळे यांचा दणदणीत भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे याप्रसंगी प्रमुख पाहुणे नाशिक महानगरप्रमुख दिनेश दादा जाधव, जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी उर्मिलाताई गायकवाड, युवक जिल्हा अध्यक्ष दामोदर अण्णा पगारे, नाशिक जिल्हा प्रवक्ते ज्येष्ठ नेते बाळासाहेब शिंदे सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हा अध्यक्ष मिहीर दादा गजबे, जिल्हा महासचिव विश्वनाथ भालेराव, जिल्हा उपाध्यक्ष नानाभाऊ पवार, भगूर नगरपरिषदेचे नगरसेवक अजय वाहने, जिल्हा संघटक दीपक भंडारी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख गोकुळ लोखंडे, जिल्हा कार्याध्यक्ष रवी अण्णा पगारे, जिल्हा महासचिव पंडित जी नेटावटे, जिल्हा उपाध्यक्ष भीमचंद्र मोरे, जिल्हा संघटक सागर भाऊ रिपोर्ट, सिन्नर तालुका अध्यक्ष विल्यम शिंदे, दिंडोरी तालुका अध्यक्ष बाळासाहेब शेजवळ, राजेंद्र गवारे, राम बाबा निकम उपस्थिती लाभणार आहे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओझर शहर वंचित बहुजन आघाडी महिला आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलन वंचित बहुजन आघाडी युवक आघाडी भारतीय बौद्ध महासभा समस्त जाधव मित्र मंडळ जनसेवा मित्र मंडळ ओझर मिलिंद मित्र मंडळ मिलिंद नगर श्रमिक नगर मित्र मंडळ नवतरुण मित्र मंडळ डॉक्टर आंबेडकर नगर सिद्धार्थ नगर मित्र मंडळ भगतसिंग नगर मित्र मंडळ भीम गर्जना मित्र मंडळ पंचशील भीम नगर मित्र मंडळ आदी प्रयत्नशील आहेत फुले शाहू आंबेडकर विचारांचे वारसदार व तमाम आंबेडकर अनुयायी भीमसैनिक यांनी या ऐतिहासिक वंचित बहुजन आघाडीच्या बहुजन परिवर्तन महापरिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे विनंती तथा आव्हान कार्यक्रमाचे आयोजक निफाड तालुका अध्यक्ष सचिन दादा हिरे व वंचित बहुजन आघाडीचे ओझर शहराध्यक्ष घनश्याम दादा जाधव यांनी केले आहे

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मोरगव्हाण गावाची केली तपासणी

## चंद्रपूर येथील तपासणी टीम मोरगव्हाण येथे दाखल

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** : रिसोड तालुक्यातील मोरगव्हाण ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये सहभाग घेतला होता. अभियानांतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम गावात राबवलेले आहेत. या रागावलेल्या उपक्रमाची पाहणी

पंचायत समिती जिवती जिल्हा परिषद चंद्रपूर येथील तालुकास्तरीय समितीने ग्रामपंचायत मोरगव्हाण भेट देऊन तपासणी व मूल्यांकन करण्यात आले.माननीय गटविकास अधिकारी तथा समिती प्रमुख लक्ष्मीनारायण दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी पंचायत संकेत राजे भोसले, विस्तार अधिकारी शिक्षण गणेश जनेफर,शाखा समन्वयक मिथुन फड, विस्तार अधिकारी पंचायत विजय साबळे, ग्रामपंचायत अधिकारी राजेश आरू, बळीराम भुतेकर, साहेबराव खिल्लारी,गोपाल देशमाने यांनी ग्रामपंचायत मोरगव्हाण येथे भेट देऊन अभियान कालावधीत झालेली कामे तपासणी केली. यामध्ये अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, आरोग्य उपकेंद्र, स्मशान भूमी परिसर, पाणपोई त्याचबरोबर व्यायाम शाळा, प्रधानमंत्री सूर्या घर योजना अंतर्गत सोलार प्लांट, परसबाग, सार्वजनिक शोषखड्डा, गांडूळ खत डेमो, घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन, शेतकरी वाचनालय,विद्यार्थी अभ्यासिका, गावातील इतरही सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता,त्याचबरोबर इतरही नाविन्यपूर्ण राबवण्यात आलेली विविध उपक्रम याची सखोल तपासणी करून याबाबत मूल्यांकन







केले आहे. यावेळी या तपासणी टीम सोबत ग्राम स्तरावरील सर्व अधिकारी,पदाधिकारी, कर्मचारी तपासणी दरम्यान उपस्थित होते.

# पुरोगामी साहित्य संमेलनाला शरद पवार यांचा हिरवा कंदील

## सांगलीत भरणार देशातील पहिले पुरोगामी संमेलन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी. शाम जगताप** : प्रतिगामी विचारांच्या वाdढत्या प्रभावाला रोखण्यासाठी आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्या पुरोगामी विचारांचे प्रबोधन करण्यासाठी सांगली येथे 'राष्ट्रीय पुरोगामी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात येणार आहे. पुरोगामी संघर्ष परिषदेच्या वतीने आयोजित या ऐतिहासिक संमेलनाला देशाचे नेते खासदार * शरदचंद्रजी पवार साहेब* यांनी हिरवा कंदील दाखवला असून, हे संमेलन येत्या नोव्हेंबर महिन्यात पार पडणार असल्याची माहिती परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संघर्ष नायक * डॉ. प्रा. सुभाष वायदंडे * यांनी दिली.

८ मे रोजी सातारा येथे डॉ. प्रा. सुभाष वायदंडे यांच्या नेतृत्वाखालील परिषदेच्या शिष्टमंडळाने शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी संमेलनाचे स्वरूप आणि उद्दिष्टांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. देशातील हे पहिलेच 'पुरोगामी साहित्य संमेलन' असल्याने संपूर्ण देशाचे लक्ष याकडे लागले आहे.

ठळक वैशिष्ट्ये:

उद्घाटक: *खासदार शरदचंद्रजी पवार साहेब.

संमेलनाचे अध्यक्ष: माजी अर्थमंत्री आ.जयंतराव पाटील साहेब.

मुख्य आयोजक व स्वागताध्यक्ष: डॉ. प्रा. सुभाष वायदंडे.

विशेष गौरव: या संमेलनात शरद पवार साहेबांना* 'पुरोगामी युगपुरुष' * या विशेष सन्मानाने गौरविण्यात येणार आहे.



यावेळी बोलताना डॉ. वायदंडे म्हणाले की, "आज समाजाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुरोगामी विचारांची मोठी गरज आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जडणघडणीत पुरोगामी विचारांचा मोठा वाटा आहे, त्याचाच उलगडा या संमेलनातून केला जाईल."

या महत्त्वपूर्ण बैठकी प्रसंगी वरिष्ठ प्रदेशाध्यक्ष प्राचार्य डॉ. बाळासाहेब साठे, महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा डॉ. सुनिता खटावकर, युवक प्रदेशाध्यक्ष मनोज दादा भिसे, राज्य महासचिव अर्चना घोरपडे, राज्य समन्वयक रमेश सोनवणे, पश्चिम महाराष्ट्र सल्लागार कमिटी अध्यक्ष प्राचार्य पंढरीनाथ आढाळगे, राजेंद्र अडागळे, सातारा जिल्हाध्यक्ष सुनील मांढरे, पुणे जिल्हाध्यक्ष गोकुळ तात्या भिसे, पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय पवार, राज्य उपाध्यक्ष दौलत दादा घाटगे, कोमल पवार, राजेंद्र आडागळे, संजय आडागळे, रामचंद्र भिसे, शंकर चव्हाण यांसह पुरोगामी संघर्ष परिषदेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संमेलनाची निश्चित तारीख लवकरच जाहीर केली जाणार असून, पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आज देगाव येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्या - परम मुसळे

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** : मालेगाव- शिवसेना नेत्या तथा आमदार भावनाताई गवळी यांच्या महिला उत्कर्ष प्रतिष्ठान सेक्शन ८ कंपनी द्वारा संचलित आयुर्वेद महाविद्यालय पुंडलिक नगर देगाव तालुका रिसोड यांच्या विद्यमाने १० मे रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले असुन याचा गरजुंनी लाभ घेण्याचे आवाहन शिवसेना तालुकाध्यक्ष परम मुसळे यांनी केले आहे.

या शिबिरात डोळ्यांची तपासणी आवश्यक नेत्र शस्त्रक्रिया व गरजूंना मोफत चष्मे वाटप, रक्ताच्या सर्व तपासण्या मोफत केल्या जातील या तपासणी साठी अधिक खर्च येतो अशा



सर्व तपासण्या अगदी मोफत केल्या जाणार आहेत हाडांच्या मजबुतीची तपासणी, मधुमेह, शुगर तपासणी व औषधोपचार व किरकोशस्त्रक्रिया गाठी काढणे, त्वचारोग तपासणी, व औषधोपचार, गर्भाशयाच्या पोटाच्या विकारांची तपासणी व औषध उपचार हृदयरोग तपासणी सोबतच आयुर्वेद पंचक्रम सुध्दा मोफत केले



जाणार आहे

रविवार दिनांक १० मे रोजी आयुर्वेद महाविद्यालय पुंडलिक नगर देगाव तालुका रिसोड येथे सकाळी दहा ते दोन वाजे पर्यंत मोफत तपासणी करण्यात येणार आहे या शिबिराचा जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन शिवसेना तालुकाध्यक्ष परम मुसळे यांनी केले आहे

# शंकर एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ . गुजर सुभाष हायस्कुल हिंदी मिडियम ९६ टक्के व इंग्लिश मिडियमचा निकाल ९८ .८२ टक्के

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प :- प्रतिनिधी गोकुळ लोखंडे** : येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ डॉ. गुजर सुभाष हायस्कुलच्या हिंदी मिडियमचा ९६% व इंग्लिश मिडियमचा निकाल ९८.८२% टक्के लागला. हिंदी मिडियम मध्ये साद जब्बार शेख ८१.२० % गुण मिळवून प्रथम क्रमांक , तौसीफ मेह्फुज आलम ७९.८० % गुण मिळवून द्वितीय क्रमांक, संस्कृति संजय नेटके ७३.००% गुण प्राप्त करुन तृतीय क्रमांक मिळविला असून यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

हिंदी मिडियम मध्ये विषयांची विगतवारी पुढील प्रमाणे : हिंदी – ८१ गुण, विदयार्थी – साद जब्बार शेख, विषयशिक्षक – बन्सीलाल गाडीलोहार, मराठी – ७४ गुण, विदयार्थी - साद जब्बार शेख, विषयशिक्षक – रुपाली पवार, इंग्लिश – ८१ गुण, विदयार्थी – संस्कृति संजय नेटके व तौसिफ मेह्फुज आलम,



विषयशिक्षक – ज्योती भाटीया, गणित – ७२ गुण, विदयार्थी – अवनीश विश्वकर्मा, विषयशिक्षक – अनुपमा पाटील व विजय पाटील, विज्ञान – ८६ गुण, विदयार्थी – साद जब्बार शेख, विषयशिक्षक – अनुपमा पाटील व विजय पाटील, समाजशास्त्र – ८५ गुण, विदयार्थी - साद जब्बार शेख, विषयशिक्षक – अनिता पवार.

इंग्लिश मिडियम मध्ये महेक शेख ९४.००% गुण मिळवून प्रथम क्रमांक, तनिश कनोजिया ९२.८०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर रितू पिंपरकर ९० .८० % गुण मिळवुन तृतीय क्रमांक मिळविला .

तसेच इंग्लिश मिडियम मध्ये विषयांची विगतवारी पुढील प्रमाणे : इंग्लिश – ९० गुण, विदयार्थी – महेक शेख, विषयशिक्षक – नाजमीन शेख, मराठी – ९१ गुण, विदयार्थी – महेक शेख, विषयशिक्षक – शितल मेहरोलिया, हिंदी – ९० गुण, विदयार्थी – सायली राव, विषयशिक्षक – स्नेहलता आहिरराव, गणित – ९६ गुण, विदयार्थी – महेक शेख, विषयशिक्षक – भाग्यश्री हिरे व सविता अडवानी, विज्ञान – १०० गुण, विदयार्थी – महेक शेख, विषयशिक्षक – भाग्यश्री हिरे, समाजशास्त्र – ९३ गुण, विदयार्थी – तनिश कनोजिया, विषयशिक्षक – नाजमीन शेख,

या प्रसंगी संस्थेच्या वतीने इयत्ता १० वी मध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना आपल्याच ज्यु. कॉलेजमध्ये मोफत शिक्षण देण्यात येईल व विज्ञान विषयात प्रथम आलेला विदयार्थी महेक शेख व विषयशिक्षक भाग्यश्री हिरे यांना प्रत्येकी आकरा हजार रोख पारितोषिक अशी घोषणा संस्थेचे कार्याध्यक्ष नविन गुरनानी यांनी केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तिरथ वासवानी, उपाध्यक्ष अनिल ग्यानचंदानी, चेअरमन नवीन गुरनानी, उपकार्याध्यक्ष मुलचंद आहुजा, सचिव रतन चावला , सहसचिव चंद्रकांत वेन्सियानी, विजय चावला, तेजपाल चावला, डॉ. विजय चावला, सुंदरसिंघ नरसिंघानी, घनश्याम केवलानी, सचिन चाफेकर, प्रकाश लखवानी, हिरो रिझवानी, रवी मेवानी, सुदेश अमेसार, सुनिल बालानी, राजेश मंगतानी,लता दियालानी व सुनिल चावला यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देत अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या . यावेळी मुख्याध्यापक डॉ. बन्सीलाल गाडीलोहार, शितल मेहेरोलिया, सिमरन चावला, अनुपमा पाटील , भाग्यश्री हिरे, स्नेहलता अहिरराव, विजय पाटिल, राजश्री मोजाड , बाळकृष्ण घोलप, अनिता पवार, रुपाली पवार, ज्योती भाटिया, हीना खान, राम धोंगडे, राजश्री शिंदे, रेवती पुरानिक, व सर्व शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .


महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# जिल्हा परिषद उर्दू नवगाव शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के




महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे**/नवगाव : (ता. पैठण) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक नवगाव शाळेत इयत्ता दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले होते. पहिल्याच वर्षी शाळेने उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व ३३ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेचा लौकिक वाढविला आहे.

या परीक्षेत सफुरा सादेक शेख हिने ९० टक्के गुण प्राप्त करून शाळेत प्रथम क्रमांक मिळविला. पठाण आएशा जुबेर हिने ८७ टक्के गुणांसह द्वितीय, बेग मसीरा वजीर हिने ८५ टक्के गुणांसह तृतीय, तर पठाण सलमा नासेर हिने ८३ टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक पटकाविला.

शाळेचे मुख्याध्यापक काझी खलील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व नियमित शैक्षणिक मार्गदर्शन देण्यात आले. दहावी वर्गाच्या शिक्षिका शेख शबनम यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच अन्सारी मसरत यांनी विशेष अध्यापन व मार्गदर्शन केले. याशिवाय शेख खादीजा, शेख नुजहत, शेख तहा, शेख अस्मा, बेग जिया, पठाण सादीया व पठाण साबिया या शिक्षक-शिक्षिकांनीही विद्यार्थ्यांच्या यशासाठी मोलाचे योगदान दिले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच पालकांकडून विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# प्रविण पट्टेबहादूर यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

## जिल्हाभरात होत आहे अभिनंदन





महाराष्ट्र जीत

**कारंजा (प्रतिनिधी)** : येथून जवळच असलेल्या ग्राम केकत उमरा येथील राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते प्रवीण कडूजी पट्टेबहादूर यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान झालेला आहे. हा पुरस्कार क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने दरवर्षी जिल्हा क्रीडा विभाग यांच्या वतीने दिला जातो.सन 2025,26 चा जिल्हा युवा पुरस्कार प्रवीण पट्टेबहादूर यांना दिनांक एक मे रोजी पालकमंत्री दत्ता मामा भरणे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे क्रीडा अधिकारी किशोर बोंडे परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्या उपस्थितीत आकर्षक सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,धनादेश व पुष्पगुच्छ देऊन हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. प्रवीण पट्टेबहादूर यांना हा पुरस्कार यासाठी देण्यात आला की त्यांनी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन विविध योजना ग्रामपंचायत पातळीवर राबवलेले आहेत. तसेच तालुका पातळीवर,जिल्हा पातळीवर वेगवेगळया योजना याची माहिती पोहोचवलेली आहे यामध्ये जलसंधारण,आरोग्य,शिक्षण,युवक युवती यांना मार्गदर्शन, रोजगार मेळावा, शोषित,पीडित,आर्थिक,दुर्बल घटकांना मदत त्याचबरोबर वृक्ष संवर्धन इत्यादी अनेक उपक्रम राबवल्याबद्दल तसेच आपले अमूल्य योगदान दिल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. याही अगोदर त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.आणि आता हा महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे त्यांचे जिल्ह्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे. यावेळी हा पुरस्कार प्रविण पट्टेबहादूर यांनी जिल्ह्यातील शेतकरी,कष्टकरी, शेतमजूर यांना अर्पण केलेला आहे. त्याचबरोबर हा पुरस्कार मिळण्यासाठी ज्यांनी,ज्यांनी प्रत्यक्ष,अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केले,अशा सर्वांचे प्रविण पट्टेबहादूर यांनी आभार मानले आहेत.

# अमेरिकन फेडरल न्यायालयाने ट्रम्प यांच्या १० टक्के जागतिक शुल्कांना 'बेकायदेशीर' घोषित केले

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली** : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत निवासस्थान आणि कार्यालय असलेल्या व्हाईट हाऊसला एक मोठा धक्का बसला आहे. अमेरिकेच्या एका फेडरल न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेले १० टक्के जागतिक शुल्क रद्द केलंय. न्यायालयाने हे शुल्क "बेकायदेशीर" आणि "कायद्याने अधिकृत नसलेले" असल्याचे घोषित केले आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी लादलेले व्यापक शुल्क फेटाळून लावणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अमेरिकन प्रशासनाने २४ फेब्रुवारीपासून लागू होणारे हे नवीन शुल्क भारतासह सर्व देशांवर १५० दिवसांच्या कालावधीसाठी लादले होते.



सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले होते की, 'आंतरराष्ट्रीय आणीबाणी आर्थिक अधिकार कायदा' (IEEPA) अंतर्गत शुल्क लादण्याचे अधिकार दिले जात नाहीत. गुरुवारी दिलेल्या एका निकालात अमेरिकेच्या 'आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने' (Court of International Trade) असे नमूद केले की, १९७४च्या 'व्यापार कायद्या'तील (Trade Act) ज्या तरतुदींचा वापर करून ट्रम्प यांनी हे १० टक्के शुल्क लादले होते, त्या तरतुदी केवळ 'देयकांचा समतोल बिघडल्याच्या' (balance-of-payments) संकटाशी संबंधित परिस्थितींमध्येच लागू होतात.२ विरुद्ध १ अशा बहुमताने दिलेल्या निर्णयात न्यायालयाने असे मानले की, ट्रम्प यांनी कायद्यांतर्गत काँग्रेसने (संसदेने) राष्ट्राध्यक्षांना दिलेल्या शुल्क-लादण्याच्या अधिकारांची मर्यादा ओलांडली आहे. बहुमताच्या या मतानुसार, हे शुल्क "अवैध" आणि "कायद्याने अधिकृत नसलेले" घोषित करण्यात आले. आपल्या निकालात, न्यायाधीश मार्क ए. बार्नेट आणि क्लेअर आर. केली यांनी असे निरीक्षण नोंदवले की, जर राष्ट्राध्यक्षांना देयकांच्या समतोलातील तूट (deficit) ओळखण्यासाठी विविध उप-खात्यांमधून (sub-accounts) निवड करण्याचे अधिकार दिले गेले, तर ते सैद्धांतिकदृष्ट्या अनिश्चित काळापर्यंत तूट असल्याचे दर्शवू शकतील आणि हे तोपर्यंत चालू राहील जोपर्यंत प्रत्येक उप-खात्यामध्ये समतोल प्रस्थापित होत नाही. या दोन्ही न्यायाधीशांनी ठामपणे सांगितले की, कायद्याचा "अशा प्रकारे व्यापक अर्थ लावल्यास" राष्ट्राध्यक्षांना शुल्क लादण्याचे अमर्याद अधिकार अप्रत्यक्षपणे प्राप्त होतील; हे अधिकार वास्तविक पाहता कायदेशीररित्या काँग्रेसकडे (संसदेकडे) असतात. त्यांनी असा निष्कर्ष काढला की, सरकारने मांडलेला कायद्याचा हा अर्थ स्वीकारला जाऊ नये. अमेरिकन प्रशासन या निकालावर अपील करेल, अशी अपेक्षा आहे. न्यायालयाचा हा निकाल थेटपणे केवळ तीन याचिकाकर्त्यांना लागू झालाय.

मसाल्यांचा व्यवसाय करणारी 'बर्लॅप अँड बॅरल' (Burlap & Barrel) आणि खेळण्यांचा व्यवसाय करणारी 'बेसिक फन' (Basic Fun). भारत आणि अमेरिकेने फेब्रुवारीमध्ये एका अंतरिम द्विपक्षीय व्यापार कराराच्या आराखड्याची घोषणा केली होती, ज्यावर आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पुन्हा वाटाघाटी केल्या जात आहेत.

# पत्रकार निलेश सोमानी यांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रतिनिधी)** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांनी अहिल्यानगर अकोले येथील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ विभागीय कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी , एवीपी न्यूज चॅनल समूहाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपत तुकाराम महाराज पगडी, शाल, पुष्पगुच्छ, दैनिक समर्थ गांवकरी दिनदर्शिका, दैनंदिनी तसेच बॅग देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.सत्कार कार्यक्रमावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका सचिव हरिभाऊ फापाळे, सरपंच प्रशांत बंदावणे तसेच राहुल आरोटे उपस्थित होते. यावेळी पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि ग्रामीण भागातील माध्यमांच्या भूमिकेबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. दैनिक समर्थ गांवकरी समूहाने ग्रामीण पत्रकारितेत केलेल्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.



# आई : ममतेचा अखंड झरा

महाराष्ट्र जीत

मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक नाती येतात, काही नाती काळाच्या ओघात बदलतात, काही नाती परिस्थितीनुसार दूर जातात; परंतु एक नाते असे असते जे जन्मापूर्वीपासून मृत्यूपर्यंत माणसाला सावलीसारखे साथ देत राहते, ते म्हणजे आईचे नाते. आई ही केवळ जन्मदात्री नसते, तर ती संस्कारांची पहिली शाळा, जीवनमूल्यांची पहिली गुरू, संघर्षात उभी राहणारी पहिली शक्ती आणि संकटसमयी धीर देणारी पहिली मैत्रीण असते. म्हणूनच जगभरात मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मातृ दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सामाजिक माध्यमांवरील संदेशांचा दिवस नसून, आईच्या त्याग, प्रेम, कष्ट आणि ममतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

आई या शब्दामध्ये संपूर्ण विश्व सामावलेले आहे. एखाद्या बालकाचा जन्म होण्यापूर्वीच आईचे मातृत्व सुरू होते. स्वतःच्या शरीरात नवजीवन वाढवत असताना ती अनेक वेदना सहन करते. त्या वेदना सहन करताना तिच्या मनात भीतीपेक्षा आनंद अधिक असतो, कारण तिच्या पोटी वाढणाऱ्या जीवाबद्दल तिच्या मनात अपरंपार प्रेम असते. बालक जन्माला आल्यानंतर आई त्याचे पालनपोषण करताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचारही करत नाही. रात्रभर जागून मुलाला सांभाळणे, त्याच्या प्रत्येक गरजेची काळजी घेणे, त्याच्या आरोग्यापासून शिक्षणापर्यंत प्रत्येक गोष्टीत लक्ष घालणे हे आईचे जीवनकार्य बनते. म्हणूनच जगातील प्रत्येक महान व्यक्तीच्या यशामागे आईचे योगदान मोठे असते. भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई ही घराचा केंद्रबिंदू मानली जाते. ती घरातील प्रत्येक सदस्याला प्रेमाने जोडून ठेवते. अनेकदा आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, सामाजिक दबाव अशा संकटांमध्येही आई आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभी राहते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून ती आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर झटत असते. इतिहास आणि साहित्यामध्ये मातृत्वाचे अनेक प्रेरणादायी संदर्भ आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर जिजाऊंच्या संस्कारांचा खोल प्रभाव होता. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचे स्वप्न दाखवले आणि न्याय, शौर्य, धर्मनिष्ठा यांचे संस्कार दिले. म्हणूनच जिजाऊंना 'राजमाता' म्हणून गौरविले जाते. यावरून आई ही व्यक्तिमत्त्व घडवणारी महान शक्ती असल्याचे स्पष्ट होते.

मातृ दिनाचा इतिहासही अत्यंत प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील ॲना जार्विस या महिलेने आपल्या आईच्या स्मरणार्थ मातृ दिन साजरा करण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या आई सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. त्यांच्या निधनानंतर ॲना जार्विस यांनी आईच्या प्रेमाचा आणि मातृत्वाच्या मूल्यांचा गौरव करण्यासाठी विशेष दिवस साजरा करण्याचा आग्रह धरला. अखेरीस १९१४ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मदर्स डे' अधिकृतपणे साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर जगभरात विविध देशांमध्ये मातृ दिन साजरा केला जाऊ लागला.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जग झपाट्याने बदलले आहे. जीवनशैली बदलली, कुटुंबव्यवस्था बदलली, नात्यांचे स्वरूपही बदलले; परंतु आईचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. उलट धकाधकीच्या जीवनात आईची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक जबाबदाऱ्या यांचा ताण वाढत असताना कुटुंब सांभाळण्याची मोठी जबाबदारी आईवर असते. अनेक महिला घर आणि करिअर यांचा समतोल साधत आपल्या कुटुंबासाठी झटताना दिसतात. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरी घरातील जबाबदाऱ्या कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे आधुनिक आईचे जीवन अधिक संघर्षमय झाले आहे.

ग्रामीण भागातील आईचे जीवन विशेषतः कष्टमय असते. शेतीची कामे, जनावरांची देखभाल, घरातील कामे, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ती सांभाळत असते. अनेकदा तिला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठीही वेळ मिळत नाही. तरीही ती तक्रार न करता आपल्या कुटुंबासाठी राबत राहते. ग्रामीण महिलांच्या या श्रमाचे आणि योगदानाचे योग्य मूल्यमापन समाजाने करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक आई मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः उपाशी राहून त्यांना शिकवतात. त्यामुळेच शिक्षणाच्या माध्यमातून अनेक मुले प्रगतीच्या शिखरावर पोहोचतात.

शहरी भागातील मातृत्वालाही वेगळी आव्हाने आहेत. वाढती स्पर्धा, महागाई, लहान कुटुंब पद्धती, व्यावसायिक ताण आणि बदलती सामाजिक मूल्ये यामुळे शहरी महिलांवर मानसिक दबाव वाढला आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, करिअरसाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी आई सतत चिंतेत असते. डिजिटल युगात मुलांवर होणारे सामाजिक माध्यमांचे परिणाम, वाढती व्यसनाधीनता, हिंसक प्रवृत्ती आणि भावनिक दुरावा या समस्यांमुळे मातृत्वाची जबाबदारी अधिक गुंतागुंतीची बनली आहे. अशा परिस्थितीत आई केवळ पालनकर्ती राहत नाही, तर ती मार्गदर्शक, समुपदेशक आणि मानसिक आधारही बनते. आईच्या ममतेला कोणतीही सीमा नसते. मुलगा गरीब असो किंवा श्रीमंत, यशस्वी असो किंवा अपयशी, आईचे प्रेम कधी कमी होत नाही. मुलाने कितीही चुका केल्या तरी त्याला माफ करण्याची ताकद आईमध्ये असते. म्हणूनच आईचे प्रेम निरपेक्ष मानले जाते. जगात अनेक नाती स्वार्थावर आधारलेली असू शकतात; परंतु आईचे प्रेम केवळ ममतेवर आधारित असते. मुलाच्या आनंदात आनंद मानणे आणि त्याच्या दुःखात दुःखी होणे ही आईची नैसर्गिक भावना असते.

आजच्या काळात वृद्धाश्रमांची वाढ ही चिंतेची बाब आहे. अनेक वृद्ध माता-पिता आपल्या मुलांपासून दूर वृद्धाश्रमात जीवन जगताना दिसतात. आधुनिक जीवनशैली, करिअरची धावपळ आणि बदलती कौटुंबिक मूल्ये यामुळे काही ठिकाणी पालकांविषयीची संवेदनशीलता कमी होताना दिसते. ज्यांनी आयुष्यभर मुलांसाठी कष्ट केले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात एकटेपण सहन करावे लागणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. मातृ दिन साजरा करताना समाजाने या वास्तवाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वर्तनातून दिसला पाहिजे.

भारतीय स्त्रियांनी मातृत्वासोबतच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. शिक्षण, विज्ञान, साहित्य, राजकारण, क्रीडा, संरक्षण, कला, उद्योग अशा प्रत्येक क्षेत्रात महिलांनी यश मिळवले आहे. या यशामागे त्यांची जिद्द आणि कुटुंबासाठीची बांधिलकी दिसून येते. अनेक महिला आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबत मुलांचे संगोपनही यशस्वीपणे करतात. त्यामुळे आधुनिक मातृत्व अधिक सक्षम आणि बहुआयामी बनले आहे.

कोरोना महामारीच्या काळात आईचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवले. लॉकडाऊनच्या काळात संपूर्ण कुटुंब घरात असताना महिलांवर कामाचा ताण वाढला होता. घरातील सर्व सदस्यांची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, मुलांच्या ऑनलाइन शिक्षणाची जबाबदारी सांभाळणे, आजारी व्यक्तींची सेवा करणे अशा अनेक भूमिका महिलांनी निभावल्या. आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक महिला डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी यांनी स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाजसेवेला प्राधान्य दिले. या काळात मातृत्वाची संवेदनशीलता आणि त्याग समाजाने जवळून अनुभवला.

आई ही मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली शिल्पकार असते. बालपणात मिळालेले संस्कार व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकतात. प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, करुणा, परिश्रम, सामाजिक जबाबदारी



यांसारखी मूल्ये मुलांना आईकडूनच शिकायला मिळतात. आई मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करते. मुलांना संकटांचा सामना करण्याची ताकद देते. म्हणूनच समाजाच्या नैतिक बांधणीमध्ये मातृत्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये आईचे स्थान विशेष आहे. मराठी साहित्यात अनेक कवींनी आणि लेखकांनी आईच्या ममतेचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. कविवर्य कुसुमाग्रज, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, बहिणाबाई चौधरी यांसारख्या साहित्यिकांनी आईच्या प्रेमाचा गौरव केला आहे. साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक मातृत्वाच्या संवेदनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. या पुस्तकातून आईचे संस्कार, त्याग आणि नैतिक मूल्ये प्रभावीपणे समोर येतात. मराठी चित्रपट आणि संगीतामध्येही आईवरील अनेक भावस्पर्शी गीते लोकप्रिय आहेत.

मातृत्व हे केवळ जैविक नाते नसून भावनिक आणि सांस्कृतिक नाते आहे. अनेक महिला स्वतःची मुले नसतानाही इतर मुलांचे संगोपन करतात. अनाथ मुलांना आश्रय देणाऱ्या महिला, समाजसेविका, शिक्षिका आणि सेवाभावी स्त्रिया या देखील मातृत्वाचेच रूप आहेत. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू मुलांसाठी कार्य करणाऱ्या महिलांनी मातृत्वाला व्यापक सामाजिक स्वरूप दिले आहे.

स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चेमध्ये मातृत्वाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. महिलांना मातृत्वासोबत करिअर आणि वैयक्तिक आयुष्य यांचा समतोल साधण्यासाठी समाज आणि शासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. प्रसूती रजा, बालसंगोपन केंद्रे, सुरक्षित कार्यस्थळे, आरोग्य सुविधा आणि समान संधी यामुळे महिलांचे जीवन अधिक सुलभ होऊ शकते. मातृत्व ही केवळ महिलांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव विकसित होणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात अनेकदा कुटुंबातील संवाद कमी होताना दिसतो. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे माणसे आभासी जगात अधिक रमू लागली आहेत. अशा परिस्थितीत कुटुंबातील भावनिक नातेसंबंध टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य आई करत असते. ती कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करते. मुलांमध्ये संवेदनशीलता, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

मातृ दिन साजरा करताना केवळ भेटवस्तू देणे किंवा शुभेच्छा देणे पुरेसे नाही. आईच्या भावना समजून घेणे, तिच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि तिला सन्मानाने वागवणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा आई स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. त्यामुळे तिच्या आरोग्याची काळजी घेणे, तिला विश्रांती मिळेल याची व्यवस्था करणे, घरकामात मदत करणे आणि तिच्यासोबत वेळ घालवणे ही खरी कृतज्ञता ठरते.

समाजातील अनेक महिलांना आजही शिक्षण, आरोग्य, पोषण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या समस्या भेडसावत आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील गर्भवती महिलांना योग्य आरोग्य सुविधा मिळत नाहीत. कुपोषण, बालविवाह, मातामृत्यू आणि लैंगिक भेदभाव या समस्या अजूनही गंभीर आहेत. मातृत्वाचा सन्मान करायचा असेल तर महिलांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक आईला सुरक्षित, सन्मानजनक आणि आरोग्यपूर्ण जीवन मिळणे हीच मातृ दिनाची खरी भावना आहे.

भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई अनेकदा स्वतःच्या इच्छा आणि स्वप्ने बाजूला ठेवते. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे भविष्य आणि घराची जबाबदारी यासाठी ती स्वतःच्या आवडी-निवडींचा त्याग करते. अनेक महिलांना आपल्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे महिलांना शिक्षण, रोजगार आणि आत्मविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे कर्तव्य आहे.

आई ही संकटसमयी धीर देणारी शक्ती असते. जीवनात अपयश आले, अडचणी निर्माण झाल्या किंवा माणूस निराश झाला तर त्याला उभारी देणारे पहिले व्यक्तिमत्त्व म्हणजे आई असते. तिचे शब्द माणसाला नवसंजीवनी देतात. म्हणूनच अनेक महान व्यक्तींनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिले आहे. आईचा आशीर्वाद आणि विश्वास माणसाला मोठ्या संघर्षातून पुढे जाण्याची प्रेरणा देतो. भारतीय लोकसंस्कृतीमध्ये आईचे रूप विविध प्रकारे व्यक्त झाले आहे. लोकगीते, अभंग, ओव्या, म्हणी आणि कथांमध्ये मातृत्वाचे भावनिक चित्रण आढळते. ग्रामीण भागातील स्त्रिया काम करताना म्हणणाऱ्या ओव्यांमध्ये आईचे दुःख, प्रेम आणि संघर्ष प्रतिबिंबित होतात.

आई आणि पर्यावरण यांच्यामध्येही एक प्रतीकात्मक साम्य आहे. जशी आई आपल्या मुलांचे संगोपन करते, तसेच पृथ्वी संपूर्ण सृष्टीचे पालनपोषण करते. म्हणूनच पृथ्वीला 'धरतीमाता' म्हटले जाते. पर्यावरणाचे संरक्षण करणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांचे रक्षण करणे होय. मातृत्वाचा संदेश माणसाला संवेदनशीलता, जपणूक आणि सहजीवनाची शिकवण देतो.

मुलांच्या मानसिक आरोग्यामध्ये आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक मुलांवर शैक्षणिक आणि सामाजिक दबाव वाढत आहे. नैराश्य, एकटेपणा, ताणतणाव आणि भावनिक अस्थिरता यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. अशा वेळी आई मुलांसाठी भावनिक आधार बनते. मुलांचे मन समजून घेणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि त्यांना प्रेमाने मार्गदर्शन करणे हे मातृत्वाचे महत्त्वाचे कार्य आहे.

समाजामध्ये स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण करण्यासाठी मातृत्वाचा योग्य सन्मान होणे आवश्यक आहे. महिलांना दुय्यम स्थान देणारी मानसिकता बदलली पाहिजे. आईचा सन्मान करणारा समाज अधिक संवेदनशील आणि प्रगतिशील असतो. महिलांविरुद्ध होणारे अत्याचार, भेदभाव आणि हिंसा थांबवण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. मुलांना बालपणापासून स्त्रियांचा आदर करण्याचे संस्कार देणे हीही आईची महत्त्वाची भूमिका आहे.

मातृ दिन हा केवळ एक उत्सव नाही, तर आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण आपल्या आईसाठी किती वेळ देतो? तिच्या भावना कितपत समजून घेतो? तिच्या कष्टांचे मूल्य किती जाणतो? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. आईला महागड्या भेटवस्तूंपेक्षा प्रेम, आदर आणि सहवास अधिक महत्त्वाचा वाटतो. तिच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि आनंद हेच मुलांसाठी सर्वात मोठे यश असते.

आज अनेक माता आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी दूर पाठवतात. मुलांच्या प्रगतीसाठी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून त्या त्यांना प्रोत्साहन देतात. मुलगा किंवा मुलगी परदेशात असली तरी आईचे मन सतत त्यांच्या काळजीत गुंतलेले असते. तंत्रज्ञानामुळे अंतर कमी झाले असले तरी आईच्या प्रत्यक्ष सहवासाची जागा कोणतीही गोष्ट घेऊ शकत नाही.

मातृत्वाचे आणखी एक महत्त्वाचे रूप म्हणजे दत्तक मातृत्व. अनेक कुटुंबे अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांना प्रेम आणि आधार देतात. अशा मातांनी मातृत्वाची व्याख्या अधिक व्यापक केली आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेमाचे नाते अधिक महत्त्वाचे असते, हे या उदाहरणांतून दिसून येते.

भारतीय समाजामध्ये सिंगल मदर्स म्हणजेच एकल मातांची संख्या वाढताना दिसत आहे. विविध सामाजिक आणि वैयक्तिक कारणांमुळे अनेक महिला एकट्याने मुलांचे संगोपन करतात. अशा महिलांना आर्थिक, सामाजिक आणि मानसिक आव्हानांचा सामना करावा लागतो. तरीही त्या खंबीरपणे आपल्या मुलांचे भविष्य घडवण्यासाठी संघर्ष करतात. समाजाने अशा मातांकडे सहानुभूतीने आणि सन्मानाने पाहण्याची गरज आहे. आईच्या कष्टांची जाणीव अनेकदा मुलांना उशिरा होते. बालपणात आईचे प्रेम सहज मिळत असल्याने त्याची किंमत समजत नाही; परंतु आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आईच्या त्यागाचे महत्त्व लक्षात येते. म्हणूनच आई जिवंत असताना तिच्यावर प्रेम व्यक्त करणे आवश्यक आहे. अनेकदा माणसे आई गेल्यानंतर तिच्या आठवणींमध्ये हरवतात; परंतु खरा सन्मान तिच्या आयुष्यातच केला पाहिजे.

मातृ दिनाच्या निमित्ताने समाजाने महिलांच्या आरोग्याविषयी अधिक जागरूक होण्याची गरज आहे. गर्भवती महिलांचे आरोग्य, पोषण, मानसिक स्वास्थ्य आणि प्रसूतीनंतरची काळजी यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि प्रत्येक महिलेला सुरक्षित मातृत्वाचा अधिकार मिळवून देणे हे समाज आणि शासनाचे कर्तव्य आहे.

आई ही संस्कृतीची वाहक असते. भाषा, परंपरा, सण-उत्सव, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीवा या सर्व गोष्टी आईकडून पुढील पिढीकडे जातात. घरामध्ये बोलली जाणारी भाषा, आचार-विचार आणि संस्कार यामध्ये आईची भूमिका केंद्रस्थानी असते. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक सातत्यामध्ये मातृत्वाचे योगदान अत्यंत मोठे आहे.

शिक्षण क्षेत्रातही अनेक मातांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक निरक्षर माता आपल्या मुलांना शिकवण्यासाठी संघर्ष करतात. स्वतः शिक्षण न मिळाल्याची खंत त्या मुलांच्या शिक्षणाद्वारे दूर करण्याचा प्रयत्न करतात. गरीब कुटुंबातील अनेक माता मजुरी करून मुलांचे शिक्षण पूर्ण करतात. अशा मातांचा संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी आहे.

मातृत्वाचा संबंध केवळ भावना आणि त्यागाशी नसून शक्ती आणि नेतृत्वाशीही आहे. इतिहासामध्ये अनेक महिलांनी संकटसमयी नेतृत्व करून समाजाला दिशा दिली आहे.

जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, यांसारख्या महिलांनी मातृत्वाच्या मूल्यांना सामाजिक परिवर्तनाशी जोडले. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करून स्त्रीशक्तीचे सामर्थ्य सिद्ध केले. आजच्या बदलत्या काळात मुलांनीही आपल्या आई-वडिलांप्रती जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. करिअर, पैसा आणि वैयक्तिक यशाच्या मागे धावताना कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ नये. आई-वडिलांसोबत संवाद साधणे, त्यांना भावनिक आधार देणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. मातृ दिनाचा खरा संदेश म्हणजे प्रेम, कृतज्ञता आणि संवेदनशीलता. आईचे ऋण कधीही फेडता येत नाही; परंतु तिचा सन्मान करून, तिच्या कष्टांची जाणीव ठेवून आणि तिच्या स्वप्नांना आधार देऊन आपण तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. समाजातील प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानजनक आणि आनंदी जीवन मिळाले तरच मातृ दिनाचा उत्सव अर्थपूर्ण ठरेल.

आजच्या वेगवान जगात माणसांमधील भावनिक नाती टिकवून ठेवणे मोठे आव्हान बनले आहे. अशा काळात आईचे प्रेम माणसाला माणुसकीची जाणीव करून देते. आईच्या ममतेमध्ये स्वार्थ नसतो, दिखावा नसतो; असते ती फक्त निस्सीम करुणा. म्हणूनच आई हा प्रत्येकाच्या जीवनातील सर्वात मोठा आधार असतो.

मातृ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने एक संकल्प केला पाहिजे की, आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित ठेवायचा नाही. तिच्या भावना समजून घेऊन, तिच्या आरोग्याची काळजी घेऊन, तिच्यासोबत वेळ घालवून आणि तिच्या स्वप्नांना पाठबळ देऊन आपण तिच्या आयुष्याला आनंदी बनवूया. कारण आई आनंदी असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि कुटुंब आनंदी असेल तर समाजही अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल.

आई ही जीवनाची पहिली कविता आहे, पहिली प्रार्थना आहे, पहिली शाळा आहे आणि पहिला देव आहे. तिच्या ममतेचा सुगंध आयुष्यभर मनात दरवळत राहतो.

म्हणूनच मातृ दिन हा केवळ कॅलेंडरवरील दिवस नसून, मानवी संवेदनशीलतेचा, प्रेमाचा आणि कृतज्ञतेचा उत्सव आहे. प्रत्येकाच्या जीवनात आईचे स्थान अद्वितीय आहे आणि म्हणूनच जगातील कोणतीही शक्ती आईच्या प्रेमाची बरोबरी करू शकत नाही. मातृत्वाच्या या पवित्र भावनेला प्रणाम करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, 'आई' हा शब्द उच्चारला की मनाला मिळणारी शांतता आणि आधार जगातील कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**